Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-4 | May-2014 Available online at www. isrj.net


# स्वातंत्र्योत्तर भारताने स्विकारलेले शिक्षणातील नविन दृष्टिकोन नविन विचारप्रवाह

श्री.चव्हाण महादेव एस.(सहशिक्षक)
मत्स्योदरी अध्यापक महाविद्यालय,
जालना- ४३१२०३

## प्रास्ताविक :-

सजीव सृष्टिचा विचार करता या जगात मानव हा बौद्धिक क्षमतेच्या बाबतीत अग्रेसर आहे. याच बुद्धिमत्तेच्या जोरावर मानवाने पृथ्वीबरोबरच इतर ग्रहांचा अभ्यास केला. या शोधांची मालिका शतकानुशतके चालू राहीली. युरोपमध्ये प्रबोधन युगानंतर मानवाची विचार करण्याची शक्ती दैववादांच्या जोखडातून बुद्धिवादाकडे अनुकूल झाली आणि जगात संशोधन आणि नवनवीन शोधाची एक अखंड चालणारी शृखंला तयार झाली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तर माहिती तंत्रज्ञानाचा वेग प्रचंड वाढला आणि जगात ज्ञानशाखांचा प्रचंड प्रस्फोट झाला आणि त्यातून या प्रस्फोटाला कसे पेलावयाचे याचे आव्हान ही मानवजातीपुढे उभे राहीले. दररोज नवनवीन शाखांचा उगम होत असतांना सुद्धा निम्मी लोकसंख्या या ज्ञानसागरापासून दूरच होती. भारतासारख्या खंडप्राय देशात आव्हानेच आव्हाने होती. जुनाट विचारसरणीत वाट्याला आलेले पारतंत्र्य आणि स्वातंत्र्यानंतर उद्भवलेल्या समस्येत निरक्षरता ही एक मोठी समस्या उभी राहिली. वैज्ञानिक दृष्टिकोन तर दूरच पण शिक्षणाचा गंध सुद्धा भारतीय जनतेला नव्हता कारण १८५३ ला जेव्हा रेल्वे रुळावरुन धावली त्यावेळी राक्षस म्हणून दूर पळणारी मनोवृत्ती भारतीय मनात दडून होती. स्वातंत्र्यांनतर भारतामध्ये जे विविध वयोगटाचे लोक होते त्यामध्ये बालकांना शिक्षण देणारे माध्यम होते पण ज्यांनी ही अवस्था पार केलेली आहे त्यांना शिक्षण कसे द्यावयाचे हा एक प्रश्न होता. त्यामुळे भारतातील नविन शिक्षण पद्धतीला काही नविन दृष्टिकोन, विचारप्रवाह स्विकार करणे गरजेचे होऊन बसले आणि भारतामध्ये अनौपचारिक शिक्षण, दुरस्त शिक्षण, निरंतर शिक्षण, वंचितांचे शिक्षण, पिडीतांचे शिक्षण आणि विशेष शिक्षण यांची गरज भासू लागली व भारतामध्ये क्रमाक्रमाने यांची मुहूर्तमेड रोवली गेली.

## १. स्वातंत्र्योत्तर भारताने स्विकारलेले शिक्षणातील नविन दृष्टिकोन नविन विचारप्रवाह व दृष्टिकोन




## १) अनौपचारीक शिक्षण (Non-Formal Education) :-

"ज्या शिक्षण प्रणालीमध्ये कोणताही ठराविक अभ्यासक्रम नसतो, कोणतेही साधन नसते, संघटीत व्यवस्थापन नसते, परिक्षेला महत्व नसते, श्रमाला महत्व नसते व ज्याला सुरुवात व शेवट नसतो त्या प्रणालीस अनौपचारीक शिक्षण असे म्हणतात."

अनौपचारीक शिक्षणाची उद्दीष्ट्ये ही औपचारीक शिक्षणाप्रमाणेच आहेत यामध्ये ज्ञानदान, कौशल्यप्रभूत्व, मुल्यरुजवणूक या बाबींचा विचार केला जातो म्हणून या शिक्षणाला विकासाचे शिक्षण असे म्हटले जाते. १९६४-६६च्या कोठारी आयोगाने सांगितल्याप्रमाणे औपचारीक शिक्षणाला समांतर म्हणून अनौपचारीक शिक्षणाचा विचार केला जावा अशी शिफारस केलेली आढळून येते. आपल्या देशाचे प्राथमिक शिक्षणाचे सावत्रिकीकरणाचे ध्येय औपचारीक शिक्षण दिल्याने पूर्ण होणार नाही त्यासाठी अनौपचारीक शिक्षणाची कास धरणे गरजेचे आहे म्हणून औपचारीक शिक्षण हे आधुनिक काळाची गरज आहे.

## २) अनौपचारिक शिक्षणाचे महत्व :-

१) अनौपचारिक शिक्षण हे अर्धवेळ वा अंशकालीन असते. त्यामुळे व्यक्ती नोकरी करुन हे शिक्षण सोयीनुसार घेऊ शकते.
२) या शिक्षणात अध्यापनापेक्षा अध्ययनावर भर असतो.
३) शिक्षक - विद्यार्थी संबंध सम पातळीवर असतात व ते अनुभवाची देवाण घेवाण एकमेकांशी करतात.
४) या शिक्षणाचे कार्यक्रम सामाजिक, आर्थिक, औद्योगिक वा सांस्कृतिक संस्थामार्फत आखले जातात.

५) शैक्षणिक कार्यक्रमात विविधता, लवचीकता असते. साचेबंदपणा नसतो.

अशा पद्धतीने ज्यांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा सर्व वयोगटांतील स्त्री-पुरूषांसाठी अनौपचारिक शिक्षणाचे कार्यक्रम आहेत.

## २) आजीवन व निरंतर शिक्षण (Lifelong and Continuing Education) :-

आज जगात सर्व क्षेत्रात क्रांतिकारक प्रस्फोट झाले आहेत. राजकीय, सामाजिक, बौद्धिक, व्यावसायिक, सैनिकी, प्रत्येक क्षेत्रात वैज्ञानिक शोधांनी प्रगती केली आहे. साधनांचे, पद्धतीचे, कौशल्यांचे, आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या, अपेक्षा वाढल्या. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला, मग ती शेतकरी, इंजिनियर, डॉक्टर, वकील, प्रशासक किंवा उद्योगपती असो, प्रत्येकाला आपल्या व्यावसायिक उन्नतीसाठी व चांगले जीवन जगण्यासाठी आपापल्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त करुन घेण्याची गरज वाढू लागली आहे. अद्ययावत ज्ञान घेण्यासाठी प्रौढांनी आपले शिक्षण सातत्याने चालू ठेवावे असा शिक्षणात नवीन विचार प्रवाह वाढू लागला. अद्ययात नवनवीन ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षण हवे अशा लोकांच्या मागण्या / अपेक्षा वाढल्यामुळे आजीवन शिक्षण - निरंतर शिक्षण हा नवीन विचार प्रवाह दृढ होऊ लागला.

आज प्रत्येक व्यक्तीला आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्यासाठी, अद्ययावत ज्ञान व कौशल्य संपादन करूनच व आपल्या कामाचा दर्जा उंचावूनच उन्नती होईल हे पटू लागले आहे. चांगले परिपूर्ण जीवन जगण्यासाठी, बदलत्या गतिमान जगात स्वतःस योग्य बनविण्यासाठी, पर्यायाने स्वतःची उन्नती करण्यासाठी आजीवन शिकत राहणे हे गरजेचे वाटू लागले आहे. प्रौढांच्या या मागण्या पूर्ण करण्यासाठी शिक्षणक्षेत्रात दूरस्थ शिक्षण, पत्रव्यहाराद्वारा शिक्षण, मुक्त विद्यापीठ द्वारा शिक्षण देण्याच्या पद्धती अस्तित्वात आल्या.

### १) निरंतर शिक्षणाचे महत्व :-

१) निरंतर शिक्षणाने ग्रामीण भागातील व मागास विभागातील अशिक्षितांचे राहणीमान उंचाविण्यासाठी मदत होते.

२) औपचारिक शिक्षणानंतर तरूणांना व प्रौढांना त्यांच्या वेळेनुसार त्यांच्या गरजा व मागण्या विचारात घेऊन त्या क्षेत्रातील शिक्षणक्रमाचे आयोजन करता येते.

३) समाजातील सर्व तरूण व प्रौढांपर्यंत नवीन ज्ञान विज्ञान पोहोचविण्याचे कार्य करता येते.

## ३) दूरस्थ शिक्षण (Distance Education) :-

दुरून दिलेले शिक्षण, दूर अंतरावरून शिक्षकाने विद्यार्थ्यांना ज्ञान देणे. दूरस्थ शिक्षण पद्धतीत शिक्षक व विद्यार्थी, औपचारिक शिक्षणपद्धतीप्रफ़माणे समोरासमोर नसतात. रूढ पद्धतीत शिक्षक अध्यापनाचे कार्य करतात व विद्यार्थी ज्ञानाग्रहण करतात. दूरस्थ शिक्षण पद्धतीत देखील अध्ययन व अध्यापन प्रक्रिया होते. परंतु या पद्धतीत शिक्षक - विद्यार्थी यांमध्ये बरेच अंतर असते. या दोघांत होणारी आंतरक्रिया लगेच होत नसून काही काळानंतर ती घडून येते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दूरस्थ शिक्षणाची सुविधा शक्य झाली आहे. दूरस्थ शिक्षण देणाऱ्या पद्धतीत, पत्रव्यवहाराद्वारा शिक्षण व आकाशवाणी व दूरदर्शन यांच्या माध्यमातून शिक्षण ही दोन प्रभावी माध्यमे आहेत.

## १) भारतातील दूरस्थ शिक्षण कार्यक्रम :

भारतात दूरस्थ शिक्षण पद्धतीने शालेय शिक्षण तसेच उच्च पातळीवरचे (विद्यापीठीय) सिक्षण या दोन्ही शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.

१९६५-६६ मध्ये शालेय स्तरावर दूरस्थ शिक्षणाचा कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर बऱ्याच संस्थांनी दूरस्थ शिक्षणाचे कार्यक्रम सुरू केले. त्यापैकी प्रारंभीच्या काही संस्था पुढीलप्रमाणे :

1) Open School, New Delhi.

2) Institute of Correspondence Studies, Ajmer.

3) Institute of Correspondence Studies, Cuttuck.

4) Patrachar Vidyalaya, Delhi.

5) Open School, Madras.

6) Institute of Correspondence Studies, U.P., Allahabad.

7) I.C.E. Board of Secondary Education, M.P., Bhopal.

उच्च शिक्षण स्तरावर दूरस्थ शिक्षण देण्याचे कार्यक्रम भारतात काही विद्यापीठांनीही सुरु केले आहेत. त्यापैकी दोन विद्यापीठे प्रामुख्याने दूरस्थ शिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनाचे काम करतात.

१) आंध्रप्रदेश मुक्त विद्यापीठ, हैद्राबाद (१९८२)

२) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली (१९८६)

शिवाय सुमारे ३० विद्यापीठे 'पत्रव्यवहाराद्वारा' शिक्षण देतात. यापैकी काही म्हणजे नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग (N.C.E.R.T.), रिजनल कॉलेज ऑफ एज्युकेशन तर्फे बी.एड. कोर्स पत्रव्यवहाराद्वारा + संपर्क कार्यक्रम (Contact Session) पद्धतीने दिला जातो. दी सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनल टेक्नॉलॉजी (C.I.E.T.) तर्फे ५ ते ११

वयोगटांसाठी शाळेतील व शाळेबाहेरील मुलांसाठी दूरस्थ शिक्षणाचे कार्यक्रम 'INSAT' द्वारा दूरदर्शनवर दाखविले जातात. अशा प्रकारचा बहुव्यापी प्रकल्प सध्या राज्यातून राबविला जातो. ह्या प्रकल्प योजनेखाली प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी दर शनिवारी कार्यक्रम केला जातो. ह्या पद्धतीने CIET ने पथदर्शक (Pilot Project) प्रकल्प प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना हिंदी शिकविण्यासाठी कार्यक्रम आकाशवाणीवर आयोजित केला जातो. CIET आणि NCERT च्या दूरस्थ शिक्षण विभागाने १९७६ पासून १५ प्रसिक्षण कार्यक्रम - दूरस्थ शिक्षणाचा कार्यक्रम लिहिणाऱ्या लेखकांसाठी आयोजित केले, तसेच दूरस्थ शिक्षण देण्यासाठी आवश्यक ते साहित्य तयार करण्यासाठी, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तक्ते तयार करण्यासाठी तीन कृतिसत्रे घेतली होती. भारतात (N.C.E.R.T.) ने एशिया ॲण्ड द पॅसिफिक प्रोग्राम ऑफ एज्युकेशनल इनोव्हेशन फॉर डेव्हलपमेंट (APEID) च्या साहाय्याने 'दूरस्थ शिक्षण' चांगले व परिणामकारक केले आहे.

## ४) वंचितांचे शिक्षण (Education of Disadvantaged) :-

भारतीय समाजात वंचित वा दुर्बल ही संज्ञा व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक स्तराशी निगडीत आहे. 'दुर्बल घटक' ही संज्ञा समाजातील खालच्या जातीचे लोक, वन्य टोळयांतून राहणारे लोक, स्त्रिया, अल्पसंख्यांक इत्यादींना उद्देशून वापरली जाते. पाश्चिमात्य प्रगत देशातील समाजात हा वंचित दुर्बल घटक आर्थिक दृष्टिकोनातून माणसाचे समाजातील स्थान ठरवितो. कमी अर्थप्राप्तीमुळे समाजातील त्याचे स्थान कमी दर्जाचे होते व ते लोक अनेक गोष्टींना वंचित होतात. न सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल घटक दुसऱ्याकडून वर्षानुवर्षे उपेक्षित व दडपला गेला. शमाजातील असंख्य सुविधा त्यांना नाकारल्या गेल्या आहेत. अमेरिकेतील निग्रो, श्रीलंकेमधील कामगार वर्ग, भारतामधील अनुसूचित जाती, भटक्या जमाती, आदिवासी हे सर्व वंचित दुर्बल समजले जातात.

### १) वंचितांच्या शिक्षणाची गरज :-

भारतातही असा वंचित, दुर्बल व दडपलेला अशिक्षित घटक समाजाचा मोठा भाग आहे. या वर्गातील लोक दोन वेळेची भाकरी कशी मिलेल या विवंचनेने सतत ग्रासलेले असतात. त्यांना मुलींचे शिक्षण व कल्याण कुठून सुचणार ? अशी असंख्य कुटुंबे व लक्षावधी मुले आहेत. समाजाचा हा मोठा भाग जर शिक्षणापासून वंचित राहिला तर देश प्रगती साधणे लांबच राहिले. परंतु समाजाचा एक भाग पांगळा बनेल. गतिहीन व चैतन्यहीन बनेल. भारताची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढते आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्य व आर्थिक तणावाने ग्रासलेल्या समाजाची प्रगती झाल्याशिवाय देशाची उन्नती होऊ शकणार नाही. भारताची लोकशाही

राज्यपद्धती यशस्वी होणार नाही. समाजाचे कल्याण साधता येणार नाही म्हणून लोकशाहीप्रधान व लोककल्याण साधण्याची इच्छा असलेल्या शासनाने घटनेच्या चौकटीत बांधून घेऊन या लोकांची प्रगती साधण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले आहेत.

## २) वंचित लोकांना शिक्षण देण्याचे महत्व :

१) वंचित असलेल्या प्रौढांना व मुलींना समाजातील इतर स्तरांवरील लोकांबरोनर आणण्यासाठी शिक्षण देण्यास महत्व होते.

२) विविध उपक्रमांचे (शैक्षणिक) आयोजन करून वंचितांच्या परिस्थितीत सर्वार्थाने गुणात्मक प्रगती साधता येते

## ३) वंचित लोकांना शिक्षण देण्याच्या विविध पद्धती :-

### १) आर्थिकदृष्ट्या वंचितांसाठी शिक्षण :-

शासनाने आर्थिकदृष्ट्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांसाठी धोरणात्मक भाग म्हणून खालील सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

१) मोफत शिक्षण

२) शिष्यवृत्तया

३) परीक्षांची फी माफ

४) पुस्तके, वह्या इतर शैक्षणिक साहित्यांसाठी अर्थसाहाय्य

५) शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था ह्यात राखीव जागा

६) मोफत शालेय गणवेश

७) आवश्यक त्या ठिकाणी मोफत वसतिगृहे, राहण्याचा व जेवण्याचा खर्च माफ

८) मोफत दूध व सकस न्याहारी

९) काही कामगारांच्या मुलांसाठी दुरदर्शन वा आकाशवाणी योजना इत्यादी.

### २) सामाजिकदृष्ट्या वंचितांसाठी शिक्षण :-

अमेरिकेत समाजशास्त्रज्ञ कोलमन यांनी Equalization of Educational Opportunity ह्या ग्रंथात विवेचन केलेले आहे की एकात्मतेचा पुरस्कार केला जावा. भारतामध्ये सरकारी, महानगरपालिका, नगरपालिका ह्यांच्या शाळांमधून संलग्र कार्यक्रम स्वीकारला जावा. मागास, वन्यजमाती, मागास समूह, मागास जातीय, अनुसूचित जाती व जमाती, भटक्या जमाती आणि आर्थिकदृष्ट्या मागास क्षेत्रातील खालचा वर्ग,

तसेच मध्यमवर्गीय या सर्व स्तरांवरील लोकांची मुले या शाळांमधून एकत्रितपणे शिकतात. यामुळे शिक्षणापासून वंचित असलेल्या व नसलेल्या मुलांमध्ये सुसंवाद होऊन विचारांची देवाणघेवाण व आंतरक्रिया घडून येते.

### ३) बौद्धिकदृष्ट्या वंचित व दुर्बलांसाठी शिक्षण :-

वंचित मुलांमध्ये बौद्धिक क्षमता अभाव असतो. शिकणाऱ्यांच्या बौद्धिक उणिवांची समस्या लक्षात घेऊन त्यातील कौशल्य क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षणावर आधारित उपक्रम विकसित करण्याच्या प्रयत्नाला उणीवापूर्तीचे शिक्षण (Compensatory Education) म्हणतात. सामान्यपणे हे शैक्षणिक उपक्रम, कार्यक्रम अभ्यासक्रमाच्या संदर्भात असतात. उदा. शुद्ध उच्चारांचे, शुद्धलेखन कौशल्य विकास उपक्रम, वाचन कौशल्य विकास उपक्रम, वर्तनबदल कार्यक्रम.

अशाप्रकारे वरील उपक्रमांच्या माध्यमातून वंचितांच्या शिक्षणाविषयी ची जाणिव आपणास होते.

### ५) पीडितांचे शिक्षण (Pedagogy of the Oppressed) :-

भारतही असा पीडित समाजाचा मोठा गट आहे की यामध्ये राजकीयदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या वंचित घटकांचा समावेश आढळतो.. पीडित समाजात भारतातील अनुसूचित जाती, भटक्या जमाती, स्त्रिया, आदिवासी, गरीब कामगार वर्ग हे लोक आहेत. तसेच अमेरिकेत निग्रो, श्रीलंकेत कामगार वर्ग, फ्रान्समध्ये 'थर्डइस्टेट' चा सामान्य जनता, रशियातील कामगार वर्ग, गरीब शेतकरी वर्ग हे पीडित समाजाचे घटक आहेत.

पीडितांसाठी पाऊलो फ्रिअरीने स्वतःच्या अभ्यासाने, चिंतनाने व प्रयोगाने जी शिक्षण पद्धती तयार केली त्या शिक्षण पद्धतीला पाऊलोने पीडितांची शिक्षणपद्धती (Pedagogy of the Oppressed) म्हटले. तसेच स्वातंत्र्यासाठी सांस्कृतिक कृती (Cultural Action for Freedom) असेही वर्णन या शिक्षणपद्धतीचे केले आहे. या शिक्षण प्रक्रियेत शिकणारा हा शिकविणाऱ्याचे केवळ साधन नसते तर या प्रक्रियेत सक्रिय भाग घेणारा सहकारी असतो.

### १) पीडितांना शिक्षण देण्याचे महत्व :

१) शिक्षण हे मानवाच्या हितासाठी आहे, कारण त्याने मानवाची प्रगती होते.
२) शिक्षणातील गरिबी - श्रीमंतीची विषमता दूर करण्यासाठी महत्वाचे आहे.
३) शिक्षणाने जाणीव जागृती घडवून आणता येते.

४) शिक्षणामुळे स्वातंत्र्य व संस्कृती यांची जपवणूक होण्यास मदत होते.

अशाप्रकारे पीडितांचे शिक्षण या माध्यमातून भारतामध्ये पसरलेला अफाट निरक्षरता काही प्रमाणात दूर करण्यासाठी मदत होते कारण भारतामध्ये अफाट लोकसंख्या आहे त्यामध्ये निरक्षर देखील भरपूर आहे हे प्रमाण कमी करण्यासाठी त्या लोकांना साक्षर करण्यासाठी त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण करुन भारताल बळकटी व अभिमानाने ताठ उभे राहण्यासाठीची कसरत शिक्षकांना करावी लागते. म्हणून या सर्वांची गरज भासते.

## ६) विशेष शिक्षण (Special Education):-

"विशेष शिक्षण म्हणजे इतरांपेक्षा वेगळया असलेल्या बालकांसाठी असलेली शिक्षण व्यवस्था होय." जे विद्यार्थी भावनिक, शारिरीक किंवा बौद्धिक स्वरुपात इतर मुलांपेक्षा वेगळे दिसून येतात. त्यांना स्पेशल विद्यार्थी किंवा दुर्बल किंवा दुर्लक्षित किंवा वेगळ्या स्वरुपाचे विद्यार्थी म्हटले जाते. त्यांच्या शारीरिक हालचाली, भावनिक व बौद्धिक वर्तन इतरांपेक्षा म्हणजे सर्वसामान्यापेक्षा वेगळया प्रकारचे दिसून येते. समाजात किंवा वर्गात अशा व्यक्ती आपणास दिसून येतात. अशा विद्यार्थ्यांना शोधून त्यांच्या दुर्बलतेवर उपाय करुन शिक्षकाने इतर विद्यार्थ्यांबरोबर मुळ प्रवाहात घेऊन जाण्याचा प्रयत्न करायचा असतो.

**अ) क्रो आणि क्रो यांच्या मते :**

"विशिष्ट हा शब्द अशा व्यक्तीसाठी उपयोगात आणला जातो की, जे विशिष्ट असे गुण सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक प्रमाणात धारण केलेले असतात की जे इतरांना प्रभावीत करतात"

"विशेष शिक्षण म्हणजे विशेष गरजा असलेल्या बालकांच्या सामान्य गरजा भागविण्यासाठी तयार केलेला आणि विशेष साधने, तंत्रे, सुविधा व उपकरणे ह्यांच्या साहाय्याने राबविलेल्या अभ्यासक्रमावर आधारित शिक्षण व्यवस्था होय."


**१) विशेष शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-**




अनेक मुलांच्या जी शारीरिक, मानसिकदृष्ट्या दुर्बल आहेत, अपंग आहेत त्यांच्या शाळेत, शिक्षणात सहभाग नाही. शिक्षण पद्धती, उपलब्धता आणि शाळा दूर असणे, तसेच निवासव्यवस्थेअभावी त्यांच्या शिक्षणात अडचण येतात. अशा अपंग बालकांसाठी वेगळ्या शाळांची निर्मिती करणे अपेक्षित आहे. याहीपेक्षा त्यांना सर्वसामान्यापेक्षा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी Main Streaming किंवा मुख्य प्रवाहात ही संकल्पना प्रत्यक्षात विशेष शिक्षण म्हणतात.

## २) विशेष शिक्षण : व्याप्ती :-

जे बालक सर्वसामान्यापेक्षा वेगळे आहेत त्यांचा वेगवेगळ्या प्रकारे अभ्यास यात करणे क्रमप्राप्त ठरते.




## ३) अपंगत्वामुळे येणाऱ्या अडचणी :-




## ४) विशेष शिक्षणाचा इतिहास :-

अपंग असलेली मुले शिक्षण घेऊ शकतात. सर्वसामान्य मुलांप्रमाणे आत्मविश्वासाने जगू शकतात. न्नोकरी करु शकतात. छोटे मोठे उद्योग करू शकतात व आपला चरितार्थ चालवू शकतात.याची कल्पनाही समाज करू शकत नव्हता. त्यामुळे अपंगांच्या शिक्षणाकडे जगात कुणीही फारसे लक्ष दिले नाही.

विशेष शिक्षणाची सुरूवात ही सामान्यतः पाश्चिमात्य राष्ट्रांमध्येच अगोदर झाली. प्रत्यक्षात फ्रेंच राज्यक्रांतीने अपंगांना शिक्षण देण्याची प्रथा सुरू केली. तो काळ 'विद्येच्या पुनरूज्जीवनाचा काळ' म्हणून ओळखला जातो.

१) इ.स. १७७० मध्ये ॲबे-डी-इपिक या धर्मोपदेशकाने सर्वात प्रथम पॅरिस येथे बधिरासाठी शाळा शोधून काढली.

२) १८२० मध्ये अमेरिकेत बधिरांच्या शिक्षणाची सुरुवात झाली.

३) थॉमस गॉल्डेट याने पॅरिस येथे शाळेत शिक्षण घेऊन खुणांच्या साह्याने बधिरांसाठी शाळा काढली.

४) पॅरिस मध्ये अंधांसाठी १७८४ ला पहिली शाळा सुरू झाली.

५) १८२५ मध्ये लुईब्रेल यांनी अंधांसाठी सहा टिंबांच्या स्पर्शेलिपीचा शोध लावला. ही लिपी ब्रेलालिपी म्हणून ओळखली जाऊ लागली.

६.) फ्रान्समधील एडवर्ड सेमीन या समाजसुधारकाने १८३७ मध्ये अपंगांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले.

## ❖ अपंग शिक्षणाची भारतातील वाटचाल :-

**१) स्वातंत्र्यपूर्वकाळ :-**

१) भारतात अपंगांच्या सिक्षणाची सुरूवात सामान्यतः पाश्चात्य मिशनऱ्यांच्या संस्थानी केली.

२) भारतात अपंगाच्या शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही.

३) १८८३ शार्प मेमोरियल ब्लाईंड स्कूल १८८३ मध्ये कु. ऐनी शार्प यांनी अमृतसर येथे पहिली अंधशाळा काढली.

४) १८९० मध्ये दक्षिण भारतात कु.ऐन एसक्विथ यांनी दुसऱ्या अंधशाळेची स्थापना केली.

५) १८९९ - कलकत्ता येथे लालबिहारी शाह यांनी अंधासाठी शाळा काढली.

६) १९०० - मध्ये मुंबई येथे अमेरिकन धर्मप्रचारक ॲन निलार्ड यांनी अंधासाठी शाळा सुरू केली.

अशा रितीने अठराव्या शतकापासून अपंगांच्या शिक्षणाची दखल घेतली गेली.

**२) स्वातंत्र्योत्तर काळ :-**

**१) नॅशनल ॲडव्हायजरी कॉन्सील फॉर हॅन्डीकॅफ (१९५५-५६) :-** शारिरीक व मानसिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या शिक्षणाच्या व नोकरीच्या सदर्भात भारत सरकारला सल्ला देण्याचे काम या मंडळाचे होते.

**२) इंडियन कौन्सील फॉर चाईल्ड वेल्फेअर (१९५२) :-** अपंग मुलांच्या कल्याणाचे काम या परिषदेवर सोपविण्यात आले व मानवतेपेक्षा उपयोजकतेच्या आधारावर मुलांना घडविणे.

**३) मुदलीयार माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२) :-** सर्व प्रकारच्या अपंगाना अपंगत्व निहाय विशेष शाळांमधूनच शिक्षण द्यावे अशी शिफारस केली.

**४) डॉ.कोठारी - भारतीय शिक्षण आयोग (१९६४) :-** सर्व विकलांग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत प्रामुख्याने दाखल करुन घ्यावे, तीव्र अपंग विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरावर विशेष शाळा उपलब्ध करून देण्यात याव्यात. सर्वसामान्य शिक्षकांना अपंगत्वाबाबतच्या प्रशिक्षणाची सुविधा असावी. अपंगाच्या शिक्षणाच्या क्षेत्रात स्वयंसेवी संस्थानी सहभागी होण्यासाठी उत्तेजनात्मक प्रोत्साहन योजना राबवावी आणि अपंगांच्या पुर्नवसनाच्या योजना तयार करण्यात याव्यात अशी शिफारस केली.

## ❖ शासन व स्वयंसेवी संस्था - संघटनामार्फत शाळांसाठी योजना :

**१) पाचवी पंचवार्षिक योजना : उद्दिष्ट्ये :-**

१) संस्थांची पुर्नरचना करणे.

२) अंध, बधिर, मानसिक दुर्बल यांच्यासाठी व तांत्रिक शिष्यवृत्त्याची योजना, निवासी कार्यशाळा सुरु करणे.

३) स्वतंत्र उद्योग विनिमय केंद्राची स्थापना करणे.

४) ५ जून १९६६ कोयनानगर येथे विद्यानिकेतनची स्थापना करण्यात आली.

५) शैनिकी शाळा - भोसला मिलिटरी स्कूल

६) १९८६ - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नवोदय विद्यालयाची स्थापना करण्यात आली.

७) १९६१ - एन.सी.ई.आर.टी. ची स्थापना.

८) १९६३ - विज्ञान प्रज्ञाशोध परीक्षा

९) १९७७ - प्रादेशिक भाषामधून परीक्षा

### ❖ समारोप :-

या सर्वामधून शाळापूर्व बालकांचा एकात्मिक विकास साध्य करण्यासाठीचे कार्यक्रम राबविले जातात.

संदर्भग्रंथ

१) निल्सन बी.हेन्री - मॉडर्न फिलॉसाफी ॲन्ड एज्युकेशन 'भारतीय प्रकाशन', सेंट्रल बुक डिपार्टमेंट.

२) पवार ना.ग. - उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण-(१९९१) 'नूतन प्रकाशन' २१८१,सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

३) पटेल एम.एस. - एज्युकेशनल फिलॉसॉफी ऑफ महात्मा गांधी (१९५३)

४) ब्रुवेकर जॉन.एस. - शिक्षणाची आधुनिक तत्वज्ञाने.

५) बोकील व्ही.पी. - फाऊंडेशन ऑफ एज्युकेशन

६) विंगो जी.मॅक्स - फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन

७) डॉ.प्रमिला काळे - अपवादात्मक बालकाचे शिक्षण